# महाराष्ट्र मंडळ, पिट्स्बर्ग

वार्तापत्र

वर्ष क्र. २२ – अंक क्र. २



कार्यकारिणी समिति
(२००७ – २००८)

अध्यक्ष
श्री. अजय बेळंबे
(७२४–९३४–५५२७)

उपाध्यक्ष
श्री. नितिन हत्तंगडी
(७२४–३२७–२१८२)

सचिव
श्री. महेश साने
(४१२–३६७–७७५१)

कोषाध्यक्ष
श्री. विष्णु धर्माधिकारी
(४१२–३६६–१९७९)

वार्तापत्र संपादक
डॉ. अरुण जतकर
(४१२–३७२–५२८३)

कार्यकारी सभासद

डॉ. सौ. शोभा जतकर
(४१२–३७२–५२८३)

सौ. अर्चना चौक
(४१२–२५९–८७४०)

सौ. सुचिता लंबोर
(४१२–४८६–३८३०)

सौ. स्वरूप नेमळेकर
(७२४–५३८–३८९४)

सौ. सोनाली पाटील
(४१२–३६७–१७७८)

श्री. बिपिन साळुंखे
(७२४–४७३–१०९०)

सौ. शकुंतला शिंदे
(७२४–९३३–१९४३)

श्री. संदीप सबनीस
(४१२–३७३–०१९४)

श्री. सागर जोशी
(४१२–७२८–५३८१)


नमस्कार !

या वर्षीचा पहिला कार्यक्रम आपणा सर्वांच्या सहकार्याने अतिशय व्यवस्थितपणे पार पडला. मकर संक्रांतीच्या कार्यक्रमाला सुमारे १८०जणांची उपस्थिती होती. या भरघोस प्रतिसादाने आम्हां सर्वांना विशेष प्रोत्साहन मिळाले असून यापुढील कार्यक्रमांची आखणी आणखी जोमाने सुरू केली आहे.

Greetings!

Due to excellent cooperation from all of you, the first program of 2008 was a grand success. Total attendance for the Makar Sankrant program was 180. This has given us tremendous encouragement and planning of the future programs of 2008 has begun with a great fervor.

या वर्षाच्या सुरुवातीला माझ्या अध्यक्षतेखालील कार्यकारिणी समितीने मंडळाच्या सभासदत्वासंबंधी काही महत्त्वाचे बदल केले होते. आपणांपैकी काहीजणांनी या निर्णयांबद्दल शंका उपस्थित केल्या होत्या. त्या शंकांचे निवारण मी करू इच्छितो.

At the beginning of 2008, the executive committee under my presidentship had made some important changes to the membership requirements. Some of you had raised some doubts about these changes. I wish to take this opportunity to explain the rationale behind our decisions.

महाराष्ट्र मंडळाचे प्राथमिक सभासदत्व सर्वांसाठी खुले आहे. या प्राथमिक सभासदत्वाचा एक फायदा म्हणजे आपण वाचत आहात ते वार्तापत्र. मंडळाच्या सर्व घडामोडींची माहिती आपणांपर्यंत वेळोवेळी ई–पत्राने पोहचत असते. तसेच मंडळाने आयोजित केलेल्या सर्व कार्यक्रमांची दारे आपणासाठी नेहमीच उघडी असतात.

The basic membership of Maharashtra Mandal is free and open to all. One benefit of the basic membership is this newsletter, which is used to communicate the schedule of events hosted/organized by the Mandal and other happenings within the community. There are no barriers to attend any of these events and the Mandal encourages everyone to attend all the events.

आपले मंडळ ही स्वयंसेवी मंडळींनी कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता चालवलेली संस्था आहे. अशी संस्था चालवण्यासाठी आर्थिक बळाची गरज असते आणि ते आर्थिक बळ बहुतांशी आपल्या वर्गणीतून उभे होते. वेळोवेळी दानशूर मंडळीही वर्गणीहून आधिक आर्थिक मदत करत असतात. 'यलो कार्ड मेंबरशिप' साठी गेली काही वर्षे अपुरा प्रतिसाद मिळत आहे. तसेच प्रत्येक कार्यक्रमासठी किती फी आकारायची हे ठरवण्यात सुरळीतपणा यावा, यासाठी आम्ही यलो कार्ड मेंबरशिपचा पर्याय रद्द केला आहे. मंडळाचा सर्वसाधारण खर्च ब्लू कार्ड मेंबरशिपच्या वर्गणीतूनच चालतो, त्यामुळे मंडळाच्या कार्यक्रमांचे जास्तीत जास्त फायदे ब्लू कार्ड मेंबर्सना मिळावेत असा कार्यकारिणी समितीचा प्रयत्न राहील.

या सर्व गोष्टींबद्दल आपले काही म्हणणे असल्यास आपले विचार मला जरूर कळवावेत.

— अजय बेळंबे, अध्यक्ष.

Our Mandal is an all-volunteer organization and there is no expectation of reward for anyone. For such an organization to function properly, financial support from the community is vital. That support comes mainly from

membership dues. On several occasions we receive additional financial support from donors who make donations over and above their membership dues.

Over the past few years, the number of Yellow card members has fallen off considerably. In order to reduce the unnecessary confusion in deciding a proper charge of various programs, the Yellow Card Membership option has been cancelled. So, the only paid membership option is the blue card membership, which allows you to attend all events without having to pay any event-specific fees. Since most of the expenses are covered by dues paid by the Blue Card Members, the committee has an obligation to ensure that the Blue Card Members receive the maximum benefit of various programs organized by the Mandal.

I would like to take this opportunity to thank all of our Blue Card Members and to request those who have not become paid members as yet to consider joining the 71 Blue Card Member families of MMGPH.

If you have further thoughts on this issue, please feel free to contact me.

– Ajay Belambe, President.

संक्रांतीच्या कार्यक्रमाचा आढावा –

दि. २६ जानेवारी २००८ रोजी "तिळगूळ घ्या, गोड बोला"च्या मधुर गुंजारवात मंडळाचा संक्रांतीचा कार्यक्रम थाटामाटात पार पडला. पिट्स्बर्गच्या परिसरातील मराठी मंडळी प्रचंड संख्येने उपस्थित राहिल्याने समारंभाला विशेष रंग चढला हे सांगायला नकोच.

प्रथम मंडळाचे अध्यक्ष अजय बेळंबे यांनी सर्वांचे स्वागत केले व कार्यक्रमाला सुरुवात झाली. सर्व मंडळी संक्रांतीनिमित्त एकमेकांना अभीष्टचिंतन करण्यात, गप्पागोष्टी करण्यात आणि एकमेकांची थट्टामस्करी करण्यात मग्न होती. चमचमत्या दागिन्यांनी व सळसळत्या पोषाखांनी वातावरण दिमाखदार झाले होते. 'काळी चंद्रकळा' नेसून आलेल्या अनेक भगिनींनी 'अस्सल भारतीय' संक्रांतीची स्मृति जागृत केली. कणसाची उसळ, वाटली डाळ, काचऱ्या, बिस्किटे, इत्यादी खुसखुशीत पदार्थांचा मंडळी आस्वाद घेत असतांनाच लहान मुलांसाठी आखलेले खेळ सुरू झाले व बालवर्गाने सर्वांचे लक्ष आपल्याकडे खेचून घेतले. खेळातील विजेत्यांना बक्षिसे वाटण्यात आली. बक्षिसांच्या मानकऱ्यांना – रसिका भामरे व सानिया सबनीस ह्यांना – मंडळाचे ज्येष्ठ व आदरणीय सभासद श्री. व सौ. धर्माधिकारी यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. त्यानंतर प्रौढांचे काही मजेदार खेळ झाले. सौ. अमिता आंबे त्यात विजेती ठरल्या. त्यानंतर सर्व महिलांस आसनबद्ध होण्यास सांगून हळदीकुंकू, तिळगूळ व संक्रांतीचे वाण लुटण्याचा पारंपरिक रिवाज पाळला गेला. एवढे होईपर्यंत स्वयंपाकघरातील खमंग वास दरवळायला लागले होते. सर्वात महत्त्वाचा कार्यक्रम जेवणाचा! तो लगेच सुरू झाला. भेळपुरी, वडापाव, अनेक प्रकारच्या चमचमीत चटण्या आणि मुलांकरता पास्ता असा भरगच्च बेत होता. घरगुती गुळाच्या पोळ्यांनी तर त्यात फारच 'गोड' भर घातली. पण एवढ्यावरच भागले नाही बरं का! गाजर हलवा, ब्राउनीज, व आईस्क्रीमने उरलेली संध्याकाळ अधिकच गोड झाली.

खेळून दमलेली, मित्रमंडळींना भेटून आनंदलेली आणि मनपसंत व चविष्ट खाण्यापिण्याने तृप्त झालेली लहानथोर मंडळी रात्री दहाच्या सुमारास आपापल्या घरांकडे परतली.

आभार – लहानमोठ्यांचे मजेदार खेळ सौ. अर्चना चौक आणि सौ. सुचिता कुलकर्णी–लांबोर यांनी आयोजित केले आणि यशस्वीरित्या हाताळले. सौ. सोनाली पाटील, सौ. विनीता बेळंबे, सौ. मनाली साने व डॉ. सौ. नीला चौधरी यांनी स्वयंपाकातील सिंहाचा वाटा उचलला. श्री. संदीप सबनीस यांनी संक्रांतीला लुटण्याची वाणे भारतातून आणली होती. या सर्वांचे विशेष आभार.

पिट्स्बर्गच्या परिसरातील मराठी मंडळी मंडळाच्या आगामी कार्यक्रमांनाही असाच भरघोस प्रतिसाद देतील अशी आम्हाला उमेद वाटते. मंडळ तुमचे, आमचे, सर्वांचे आहे. सर्वांचा सहभाग म्हणजेच मंडळाचे उज्ज्वल भविष्य!

# महाराष्ट्र मंडळ, पिट्स्बर्ग

वार्तापत्र

वर्ष क्र. २२ – अंक क्र. २


## मंडळाचा पुढील कार्यक्रम –

## रंगसंगीत २००८ – Ranga Sangeet 2008

दोन मराठी एकांकिका आणि नृत्य/संगीताची मैफल, असा ३ तासांचा भरगच्च कार्यक्रम! एकूण ३५ कुशल स्थानिक कलाकार या कार्यक्रमात रंगमंचावर आपली हजेरी लावतील. अधिक माहिती पान ७ व ८ वर पहावी.

3 Hours of Solid entertainment! Two one-act Marathi plays and a music/dance recital presented by local artists. This event will stage a total of 35 talented local artists. See more details on Pages 7 and 8.

| | |
|---|---|
| तारीख, वेळ – | शनिवार, दि. २२ मार्च, २००८<br>Saturday, 22nd March, 2008 |
| स्थळ – | श्री. वेंकटेश्वर मंदिराचे सभागृह<br>Auditorium of S. V. Temple in Pittsburgh |
| फी – | ब्लू कार्ड मेंबर्स – विनामूल्य<br>इतरांना – प्रोढ – १५ डॉलर्स, बारा वर्षांवरील मुलांना – ५ डॉलर्स |
| Charges - | No charge for Blue Card Members<br>Others - $ 15/adult and $ 5 for Children over the age of 12. |

## 'रंगसंगीत'नंतरचे कार्यक्रम –

## २. मराठी चित्रपट – 'पक पक पकाक'

| | |
|---|---|
| तारीख, वेळ – | शनिवार, दि. १७ मे, २००८<br>Saturday, 17th May, 2008 |

बाकीचे तपशील पुढील वार्तापत्रातून कळवण्यात येतील.

Details will be communicated via the next newsletter.

## ३. पिकनिक

| | |
|---|---|
| तारीख, वेळ – | शनिवार, दि. १४ जून, २००८; सकाळी ११ पासून |
| स्थळ – | एल्म ग्रोव्ह, पीटर्स टाउनशिप, साउथ हिल्स |

दि. १४ जूनचा कार्यक्रम पावसामुळे रद्द करावा लागल्यास पुढील तारीख (rain date) २१ जून.

Mandal has scheduled Picnic from 11 AM onwards on 14 June 2008 at the Elm Grove in Peters Township, South Hills. The rain date is 21 June 2008.

## ४. गणेश चतुर्थी

| | |
|---|---|
| तारीख, वेळ – | रविवार, दि. ७ सप्टेंबर, २००८; सकाळी १०:३० पासून |
| स्थळ – | हिंदु-जैन मंदिर |

Mandal will celebrate Ganesha Chaturthi on Sunday, 07 September 2008. The celebration will begin at 10:30 AM in the Hindu-Jain Temple in Pittsburgh.

## ५. कोजागिरी KOJAGIRI

| | |
|---|---|
| तारीख, वेळ – | शनिवार, ११ ऑक्टोबर, २००८ |
| स्थळ – | या कार्यक्रमाचे इतर तपशील पुढील वार्तापत्रातून कळविण्यात येतील. |

Mandal will celebrate KOJAGIRI night on Saturday, 11 October 2008. Further details will be published in the future newsletters.

## ६. दिवाळी

तारीख, वेळ – शनिवार, १ नोव्हेंबर, २००८; दुपारी ४ पासून

स्थळ – या कार्यक्रमाचे इतर तपशील पुढील वार्तापत्रातून कळविण्यात येतील.

Mandal will celebrate DIWALI on Saturday, 01 November 2008. Further details will be published in the future newsletters.

***********************************************************************************************

मंडळ वार्ता –

- डॉ. संतोष व सौ. सुनीता पंडित यांनी गतवर्षीच्या डिसेंबर महिन्यात दिलेल्या देणगीबद्दल मंडळाकडून उभयतांना मनःपूर्वक धन्यवाद.
- डॉ. सौ. शोभा जतकर यांनी कार्यबाहुल्यामुळे सचिवपदावर अन्य कोणाची नियुक्ती करावी अशी विनंती केली आहे. त्या विनंतीस मान देऊन आता श्री. महेश साने यांची मंडळाच्या सचिवपदावर नेमणूक केली आहे. डॉ. सौ. शोभा जतकर सभासद या नात्याने कार्यकारिणी समितीवर राहतील.
- आजपर्यंत एकूण ७१ कुटुंबे ब्लू कार्ड मेंबर झाली आहेत. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार!
- कार्यकारिणी समितीची दुसरी बैठक दि. १५ फेब्रुवारी रोजी भरली होती. त्या बैठकीत रंगसंगीत या आगामी कार्यक्रमाबद्दल व मेंबरशिपबद्दल काही सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर व शंकांवर चर्चा झाली.

बृहन्महाराष्ट्र मंडळाची वार्ता –

'मैत्र'चे २००८ सालाचे अधिवेशन दि. ४ ते ६ जुलै रोजी सॅन फ्रान्सिस्को येथे आयोजित केले जात आहे. मैत्र ही बृहन्महाराष्ट्र मंडळाची युवक शाखा आहे आणि 'मैत्र'च्या कार्यवाही मंडळाचे पदाधिकारी होण्यासाठी तरुण मुलामुलींना आवाहन देण्यात आले आहे. गायन, वाद्यवादन, नृत्य आणि नाट्य–अभिनय अशा विविध कलांमधील आपले नैपुण्य सादर करण्याची संधि सर्व मराठी यवक–युवतींना मिळाची म्हणून मैत्र या वर्षीच्या अधिवेशनापासून 'टॅलंट ट्रान्स्फर' उपक्रम सुरू करीत आहे. पिट्स्बर्गच्या महाराष्ट्र मंडळातील ज्या तरुण मंडळींना पिट्स्बर्गचे कलाकार म्हणून या उपक्रमात भाग घेण्याची इच्छा आहे, त्यांनी अधिक माहितीसाठी श्री. अजय बेळंबे यांच्याशी संपर्क साधावा. तसेच http://www.bmmonline.org/maiytra.htm किंवा www.bmmonline.org या वेबसाईट्स्ना भेट द्यावी.

**BMM News:**

**MAIYTRA**, (**M**aharashtrian **A**ssociation of **I**ndian **Y**outh **T**ogether **R**epresenting **A**merica) 2008 Convention will be held in San Francisco between July 4-6. MAIYTRA is a sub organization of BMM. BMM is currently soliciting youth members to be part of the governing body of MAITRYA. If you would like to represent Pittsburgh Maharashtra Mandal, please contact Ajay Belambe for more information. MAIYTRA is also starting a Talent Transfer program which would give an opportunity to local young talent to show their skills in activities such as singing, dancing, one act plays, instrument recitals etc. This talent transfer competition will take place during the upcoming convention. For more information, please visit http://www.bmmonline.org/maiytra.htm or www.bmmonline.org

## अभिनंदन

- मंडळाचे दीर्घकालीन सभासद डॉ. दिलीप व सौ. निमा कार यांची कन्या डॉ. सौ. एरिका व जामात डॉ. विल्यम डेल्फियट यांना दि. १० जानेवारी रोजी मुलगा (सम्राज) झाला. नूतन आईवडील व नूतन आजी–आजोबा यांचे हार्दिक अभिनंदन आणि नवागतास अनेकोत्तम शुभाशीर्वाद.
- मंडळाचे दीर्घकालीन सभासद श्री. प्रकाश व डॉ. सौ. लीना शेटे यांचा मुलगा डॉ. नीलेश व स्नुषा एमी यांना दि. २६ जानेवारी रोजी मुलगी (लीला) झाली. नूतन आईवडील व नूतन आजी–आजोबा यांचे हार्दिक अभिनंदन आणि नवागतास अनेकोत्तम शुभाशीर्वाद.

# महाराष्ट्र मंडळ, पिट्स्बर्ग

वार्तापत्र

वर्ष क्र. २२ — अंक क्र. २


## दुःखद निधन

मंडळाचे सचिव श्री. महेश साने यांच्या मातोश्रींस शनिवार दि. २३ फेब्रुवारी २००८ रोजी, वयाच्या ६५व्या वर्षी, भारतात देवाज्ञा झाली. मंडळाचे सर्व सदस्य त्यांच्या दुःखात सहभागी आहेत. ईश्वर मृतात्म्यास सद्गति देवो.

मंडळाची सर्व वार्तापत्रे आणि निवेदने ई—पत्राद्वारे पाठवली जातात. तसेच मंडळाच्या सर्व आगामी कार्यक्रमांविषयींची निवेदने व मंडळाबद्दलची इतर माहिती मंडळाच्या वेबसाइटवर (mmpgh.org) उपलब्ध असते, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच आपल्या परिसरात किंवा आपल्या कामाचे ठिकाणी कोणी नवीन कुटुंब किंवा व्यक्ति आल्यास त्यांनाही मंडळाबद्दल माहिती करून द्यावी व त्यांना मंडळाची वेबसाइट पाहण्यास सांगावे.


- ब्लू कार्ड सदस्यांची अद्ययावत यादी  पान ६

Up-to-date list of Blue Card Members – Page 6

- दि. २२ मार्च रोजीच्या रंगसंगीत कार्यक्रमाची अधिक माहिती  पान ७ आणि ८.

Additional information about Ranga-Sangeet Program scheduled for 22nd of March – Pages 7 and 8.

## 2008 List of Blue Card Members to Date -

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Ambe Prashant and Ameeta | 36 | Kotwal Deepak and Nirmal |
| 2 | Apte Udayan and Pallavi | 37 | Kulkarni Pradyumna and Geeta |
| 3 | Badami Mohan and Nivedita | 38 | Kulkarni Saroj |
| 4 | Belambe Ajay and Vinita | 39 | Lambore Sanjay and Sucheta |
| 5 | Bhadsavle Anil and Pushpa | 40 | Lele Milind and Anagha |
| 6 | Bhamre Vilas and Manisha | 41 | Lovalekar, Tushar and Mita |
| 7 | Bhende Shailesh and Mananda | 42 | Manohar Priyadashan and Anagha |
| 8 | Bhide Shantanu and Veena | 43 | Medhekar Niraj and Anjali |
| 9 | Chakravorty Sangeeta | 44 | Mujumdar Ratnakar and Swati |
| 10 | Chaudhari Neela and Narayan | 45 | Mulherkar Harshal and Amita |
| 11 | Chauk Srinivas and Archana | 46 | Nemlekar Pramod and Swarup |
| 12 | Deoras Bhanu | 47 | Palekar Sharad and Alka |
| 13 | Deoras Sunil and Kiran | 48 | Pandit Santosh and Sunita |
| 14 | Deshmukh Uday and Meenal | 49 | Paranjpe Ajali and Shirish |
| 15 | Dharmadhikari Vishnu and Vasudha | 50 | Paranjpe Ajit and Preeti |
| 16 | Dixit Niranjan and Sudha | 51 | Patil Balaji and Vaishali |
| 17 | Dixit Abhijit and Vrushali | 52 | Patil Rajesh and Sonali |
| 18 | Fulay Pradeep and Jyotsna | 53 | Patkar Shailesh and Seema |
| 19 | Ghate Vijay and Sandhya | 54 | Pearce Usha |
| 20 | Ghatge Prakash and Alka | 55 | Phatak Achala |
| 21 | Ginde Kaustubh and Mayura | 56 | Potdar Rajesh and Preeti |
| 22 | Godbole Girish and Deepa | 57 | Sabnis Sandeep and Mrunal |
| 23 | Godse Ravi and Madhuri | 58 | Saboo Santosh and Shilpa |
| 24 | Hattangady Nitin and Anita | 59 | Sahasrabudhe, Ruta |
| 25 | Hegde Subhash and Vaishali | 60 | Salunkhe Bipin and Ashwini |
| 26 | Inamdar Mahesh and Gauri | 61 | Sample Vivek and Purnima |
| 27 | Jadhav Manish and Monica | 62 | Sane Mahesh and Manali |
| 28 | Jatkar Arun and Shobha | 63 | Shete Prakash and Leena |
| 29 | Joshi Kishor and Usha | 64 | Shinde Dilip and Shakuntala |
| 30 | Joshi Sagar | 65 | Telang Rahul and Ashwini |
| 31 | Joshi Sharad and Asha | 66 | Teredesai Pradeep and Chitra |
| 32 | Kaneri Anup and Sharada | 67 | Thakar Girish and Leena |
| 33 | Kar Dilip and Nima | 68 | Vaidya Atul and Arundhati |
| 34 | Karawande Vivek and Prajakta | 69 | Velankar Sachin and Laxmi |
| 35 | Karkhanis Lukena | 70 | Walavalkar Sameer and Mukta |
| | | 71 | Warty, Vijay and Arti |

# महाराष्ट्र मंडळ, पिट्स्बर्ग

वार्तापत्र

वर्ष क्र. २२ – अंक क्र. २








Maharashtra Mandal Pittsburgh
presents
Two Marathi Ekankika based on stories from our own lives
Sutticha Diwas
Some things don't change no matter where you are...like the way you spend your weekend...
काही गोष्टी बदलत नाहीत... तुम्ही जगाच्या पाठीवर कुठेही राहा...उदाहरणार्थ सुट्टीचा दिवस...
CAST
Anup Kaneri
Niranjan Desai
Lukena Karkhanis
Writer
Priyadarshan Manohar
Director
Udayan Apte
Sets
Ratnakar Mujumdar
Music
Piyusha Sane
Lights
Devdatta Apte
Virtual Reality
We struggle to maintain our identity here in US, strive to preserve our culture...but wait a minute...are we the only one worried?
आपण NRM...नॉन रेसिडेन्शियल महाराष्टियन...आपल्या देशापासुन दूर, माणसांपासुन दूर, आपली संस्कृती जपण्याचा अटोकाट प्रयत्न करतो...परंतु संस्कृती जपण्याची काळजी फक्त आपणच तर करत नाही ना?
CAST
Sandeep Sabnis
Saniya Sabnis
Anagha Manohar
Nikita Patkar
Sharada Kaneri
Seema Patkar
Mahesh Sane